मार्गदर्शन • अभिष्टचिंतन सोहळ्यात पांडुरंग तुळसकर यांचे प्रतिपादन

# शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याची गरज

समुद्रपूर, (वा). विद्या विकास शैक्षणिक संस्थेनी केवळ मार्गदर्शकाची भूमिका बजवावी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात शैक्षणिक सुखसोई उपलब्ध करून दिल्याने येथील तज्ञशिक्षक,कर्मचाऱ्यांनी परिश्रमातुन ग्रामीण भागातील विद्याविकास महाविद्यालयाचा शैक्षणिक गुणवृत्ता वाढल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होतो. ग्रामीण भागातील ही संस्था प्रगतीपथावर असुन माझ्या कर्मचाऱ्यांचा मला अभिमान असल्याचे मत पांडुरंग तुळसकर यांनी व्यक्त केले .

संस्थापक अध्यक्ष पांडुरंग तुळसकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन विद्याविकास महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंग तुळसकर तर प्रमुख सचिव डॉ. उमेश तुळसकर,नगरपंचायत चे उपाध्यक्ष बाबाराव थुटे, प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य डॉ. नयना तुळसकर, पर्यवेक्षक प्रा.किरण वैद्य उपस्थितीत होते. याप्रसंगी पांडुरंग तुळसकर यांना शाल श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध विभागाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. उमेश तुळसकर यांनी महाविद्यालय उच्च श्रेणीत येण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणार असल्याचे म्हणाले. प्रास्ताविकेतून प्राचार्य डॉ.किशोर रेवतकर यांनी विविध उपक्रम व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे संचालन प्रा.मेघश्यात ढाकरे यांनी केले तर आभार डॉ.स्वाती येवतकर यांनी मानले.



कार्यक्रमाला डॉ. राजविलास कारमोरे, डॉ. रमेश निखाडे, डॉ. राजेशाम वेलुपुला, डॉ. विठोबा चंदनखेडे, डॉ. सदानंद सावे, डॉ. प्रमोद अलोणे, डॉ. प्रकाश तळे, डॉ. नितीन अखुज, डॉ. अर्चना भेंडे, डॉ. सिल्पा समदूरकर, डॉ सोमनाथे, डॉ. शितल अवघडे, डॉ. मंगला खुणे, प्रा.विलास बैलमारे, प्रा.अजय मोहोड,, प्रा.फारीश अली, प्रा.मनोज कोरेकर, प्रा घनशाम कदमधाड, प्रा.मनोज खेकरे, प्रा.महेश चिव्हाने, प्रा.रतन आस्कर, प्रा.दिपक वालदे, मुकेश हुलके, धनेश रंगारी, आशिष पाटील, इश्वर ठाकरे, बंटी तेलतुंबडे, संजय पवार, वामन झाडे, योगेश घटेसह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सहकार्य केले.



पांडुरंग तुळसकर यांचा सत्कार करताना उमेश तुळसकर, प्राचार्य डॉ. किशोर रेवतकर व मान्यवर

# विद्या विकास शैक्षणिक संस्था प्रगतिपथावर : तुळसकर

**समुद्रपूर** : विद्या विकास शैक्षणिक संस्थेने केवळ मार्गदर्शकाची भूमिका बजावून ग्रामीण भागातील महाविद्यालयात शैक्षणिक सुखसोयी उपलब्ध करून दिल्याने येथील तज्ज्ञ शिक्षक, कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रमातून समुद्रपूरसारख्या ग्रामीण भागातील विद्या विकास महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता वाढवल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. ग्रामीण भागातील ही संस्था प्रगतिपथावर असून आपल्या कर्मचाऱ्यांचा आपल्याला अभिमान असल्याचे मत अभीष्टचिंतन सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना संस्थापक अध्यक्ष पांडुरंग तुळसकर यांनी केले.विद्या विकास महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग तुळसकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून सचिव डॉ. उमेश तुळसकर, नगरपंचायत उपाध्यक्ष बाबाराव थुटे, प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य डॉ. नयना तुळसकर, पर्यवेक्षक प्रा. किरण वैद्य उपस्थित होते डॉ. उमेश तुळसकर यांनी, महाविद्यालय उच्च श्रेणीत येण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. किशोर रेवतकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मेघशाम ढाकरे यांनी तर आभार डॉ. स्वाती येवतकर यांनी मानले.